| CNR NO.MHSN170009392024 | | |
|---|---|---|
| | अपिल दाखल तारीख | ०६.०९.२०२४ |
| | अपिल नोंदविल्याची तारीख | ०६.०९.२०२४ |
| | निकाल तारीख | ३०.०७.२०२६ |
| | कालावधी | वर्ष महिने दिवस<br>०१ १० २४ |

**विटा येथील जिल्हा न्यायाधीश क्र.२ यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी उषा वि. इंदापूरे यांचेसमोर)**

**किरकोळ दिवाणी अपिल क्र. ३१७/२०२४**

**निशाणी क्र. १३**

श्री. चंद्रकांत आप्पा शिंदे )
वय – ५१ वर्षे, धंदा – शेती. ) **अपिलार्थी**
रा. लेंगरे, ता. खानापूर, जि. सांगली. ) **( मुळ वादी )**

**विरुध्द**

१. श्री. आप्पा भगवान शिंदे, )
वय – ७१ वर्षे, धंदा – शेती. )
रा. लेंगरे, ता. खानापूर, जि. सांगली. )
)
२. लक्ष्मी आप्पा शिंदे, )
वय – ६९ वर्षे, धंदा – शेती. ) **जाबदार**
रा. लेंगरे, ता. खानापूर, जि. सांगली. ) **(मुळ प्रतिवादी)**
)
३. जयश्री अशोक यादव, )
वय – ४६ वर्षे, धंदा – शेती. )
रा. रेणावी, ता. खानापूर, जि. सांगली. )
)
४. राजश्री रेवणसिध्द सावंत, )
वय – ४४ वर्षे, धंदा – शेती. )
रा. मादळमुटी, ता. खानापूर, जि. सांगली. )

USHA VEERENDRA INDAPURE
Digitally signed by USHA VEERENDRA INDAPURE
Date: 2026.07.30 16:39:36 +0530

**दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १०४ सह आदेश ४३ अन्वये अपिल**

अपिलार्थीतर्फे विधीज्ञ : श्री. पी. डी. भोसले.

जाबदार क्र.१ ते ४ तर्फे विधीज्ञ : श्री. एस. पी. दुगम.

**न्यायनिर्णय**
**(ता. ३०.०७.२०२६ रोजी जाहीर केला)**

दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, विटा यांनी दि. २०.०७.२०२४ रोजी नियमित दिवाणी दावा क्र. ४३/२०२३ मधील निशाणी ५ च्या अर्जाखालील पारित केलेल्या आदेशावर नाराज होवून मुळ वादी यांनी सदरचे अपिल दाखल केले आहे. या पुढे पक्षकारांना मुळ दाव्यात संबोधले त्याप्रमाणे वादी व प्रतिवादी असे संबोधण्यात येईल.

२. वादीचे निशाणी ५ च्या अर्जातील कथन खालीलप्रमाणे आहे.

दावा कलम १ या दावा मिळकतीचे केवळ रेकॉर्डसदरी प्रतिवादींचे नाव नमूद असल्याचा गैरफायदा घेवून प्रतिवादींनी दावा मिळकतीबाबत विक्री, लिज, दान, गहाण, चार्ज असा कोणताही लेखी अथवा तोंडी कराराने किंवा अन्य प्रकारे दावा मिळकतीमध्ये कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध निर्माण करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद प्रतिवादींचेविरुध्द मिळण्याकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३. दावा मिळकतीचे वर्णन:–

**दावा १अ मिळकत –**

मौजे लेंगरे, ता. खानापूर, जि. सांगली येथील शेत जमिन मिळकतींचे वर्णन –

| अ.क्र. | गट.नंबर | क्षेत्र<br>हे. आर | हिस्सा<br>हे. आर. |
|---|---|---|---|
| १ | १०७९ | २–९८ | १–४९ |

USHA VEERENDRA INDAPURE Digitally signed by USHA VEERENDRA INDAPURE Date: 2026.07.30 16:39:44 +0530

| | | | |
|---|---|---|---|
| २ | ५३९ | ०–२४ | ०–०८ |
| ३ | ५४२<br>विहीर व पाणी पाळीतील हिस्सा | ०–०२ | ०–००.३३ |
| ४ | ९६८/१<br>विहीर व पाणी पाळीतील हिस्सा | ०–०५ | ०–०१.८८ |
| ५. | ९६८/३ | ०–०९ | संपूर्ण. |
| ६. | ९६८/५ | ०–१६ | संपूर्ण. |
| ७. | ९९८/११ | ०–३३<br>पो. ख. ०.०१ | ०–१६.५० |
| ८. | ९९८/१२ | ०–५४<br>पो. ख. ०.०१ | ०–१३.५० |
| ९. | ९९८/१३ | ०–२१ | ०–०५.२५ |
| १० | ५३७ | ०–०६ | संपूर्ण. |

वरील मिळकतींपैकी अनुक्रमांक १, २, ७, ८ ते १० या मिळकतीच्या चतु:सिमा वादीने दाव्यात नमूद केल्या आहेत.

**<u>दावा १ब मिळकत</u> –**

मौजे लेंगरे, ता. खानापूर, जि. सांगली येथील शेत जमिन मिळकतीचे वर्णन –

| अ.क्र. | गट.नंबर | क्षेत्र<br>हे. आर | हिस्सा<br>हे. आर. |
|---|---|---|---|
| १ | ८२१/अ | १–६० | ०–२० |

यासी चतु:सिमा –

पूर्वेस – रंगा गोविंद सावंत यांची निराळे गटाची जमिन.

दक्षिणेस – सांगोलेकडे जाणारा रस्ता.

पश्चिमेस – न.म.पैकी अशोक खंडागळे यांची जमिन.

उत्तरेस – न.म. पैकी शिवाजी बापू खंडागळे यांची जमिन.

USHA VEERENDRA INDAPURE
Digitally signed by USHA VEERENDRA INDAPURE
Date: 2026.07.30 16:39:49 +0530

येणेप्रमाणे जमिन, झाडझुड, ताल, बंधोरा, दगडमाती, विहीर, विहीरीतील पाणी पाळीचा हिस्सा, मोटवण, पाटपण व त्यातील पाणी पाळीप्रमाणे घेण्याच्या हिस्स्याचे इजमेंटचे हक्कासहीत.

**दावा १क मिळकत –**

मौजे लेंगरे, ता. खानापूर, जि. सांगली येथील ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामपंचायत नमूना ८ सन २०१९–२०२० ते २०२२–२३ चे कर आकारणी नोंदवहीप्रमाणे मालमत्ता क्रमांक ९१५ चे वर्णन –

| अ.क्र. | नंबर | क्षेत्र<br>चौ. मी. | वर्णन |
|---|---|---|---|
| १ | १/क/१ | लांबी २७ x रुंदी १४ | इतर पक्के घर (दगड विटांचे चुना किंवा सिमेंटचे घर) पहिला मजला. |
| २ | १/क/२ | लांबी ३८ x रुंदी २६ | इतर पक्के घर (दगड विटांचे चुना किंवा सिमेंटचे घर) पहिला मजला. |
| ३. | १/क/३ | लांबी २६ x रुंदी ८ | अर्धे पक्के घर (दगड विटांचे मातीचे घर) पहिला मजला. |
| ४. | ब/४ | लांबी ३० x रुंदी २४ | पडसर/ खुली जागा. |

येणेप्रमाणे दगडमाती सर्व इजमेंटरी हक्कासहीत.

यापूढे वर नमूद मिळकतींना अनुक्रमे दावा कलम १(अ), दावा कलम १(ब) व दावा कलम १(क) असे संबोधण्यात येईल.

**४.** प्रतिवादी क्र. १ व २ पती–पत्नी असून वादी हा त्यांचा मुलगा व प्रतिवादी क्र. ३ व ४ त्यांच्या मुली आहेत. दावा कलम १(अ) व (क) या मिळकती वादी व प्रतिवादी यांच्या वडिलार्जित मिळकती असून त्यात वादीचा १/५ हिस्सा आहे व समाईक कब्जेवहीवाट आहे. दावा मिळकत १(अ) व (क) चे वादी व प्रतिवादी यांच्यात वाटप झाले नव्हते व नाही. वादीचे वयाच्या १८ ते १९ वर्षापासून २०१२

USHA VEERENDRA INDAPURE
Digitally signed by USHA VEERENDRA INDAPURE
Date: 2026.07.30 16:39:54 +0530

पर्यंत वादी हे विजयवाडा येथे सोनेचांदी गलाई व्यवसाय करीत होते. वादीची प्रकृती बिघडल्यामुळे मौजे लेंगरे येथे राहण्यास आला. वादीने त्याच्या गलाई व्यवसायाच्या उत्पन्नातून दावा कलम १(ब) ही मिळकत खरेदीदस्त क्रमांक ६६७/२००३ अन्वये खरेदी घेतली व त्या मिळकतीत स्वखर्चाने नवीन घर मिळकत बांधून पत्नी व मुलांसह रहात आहे. त्या घराचा ग्रामपंचायत मिळकत क्रमांक १७५९ आहे.

**५.** वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटूंबाला केव्हाही पैशाची गरज नव्हती, परंतु प्रतिवादी क्र. १ च्या नावाची नोंद दावा मिळकतींना असल्यामुळे, त्याचा गैरफायदा घेवून वादीचा हक्क डावलण्याच्या उद्देशाने गट क्रमांक ५३७ ही बागायत जमीन प्रतिवादी क्र. ३ व ४ यांच्या नावे प्रतिवादी क्र. १ ने बिनभरण्याच्या, बोगस व बेकायदेशीर खरेदीदस्त क्रमांक ३२३७/२०२२ नुसार दिनांक २८/०९/२०२२ रोजी खरेदी दिली. सदरचे खरेदीदस्त वादीच्या हिस्स्यावर बंधनकारक नव्हते व नाही. सदर खरेदीदस्ताची वादीला माहीती मिळाली असता दिनांक ०७/१२/२०२२ रोजी वादीने दावा मिळकतीचा ७/१२ उतारा काढून पाहिला त्यावेळी प्रतिवादी क्र. १ चे नाव कमी होवून प्रतिवादी क्र. ३ व ४ यांच्या नावाची नोंद झाल्याचे वादीला समजले. त्यानंतर वादीने त्या खरेदीदस्ताची सहीशिक्क्याची प्रत दिनांक २१/१२/२०२२ रोजी प्राप्त केल्यानंतर दिनांक २५/१२/२०२२ रोजी प्रतिवादी क्र. १ ला खरेदीदस्ताबाबत विचारले. त्यावेळी प्रतिवादी क्र. १ ने त्याच्या नावावर सर्व मिळकती असल्यामुळे त्या मिळकती तो कोणालाही देईल व काहीपण करेल असे वादीला सांगितले, म्हणून वादीने दावा कलम १(अ) व (क) मधील त्याच्या १/५ हिस्स्याच्या मिळकतीची मागणी केली व दावा कलम १(ब) ही मिळकत त्याच्या नावे करुन देण्यास सांगितले, त्यास प्रतिवादी क्र. १ ने नकार दिल्यामुळे वादीने दावा दाखल केला.

**६.** प्रतिवादी क्र.१ च्या नावाची नोंद दावा मिळकतींना असल्यामुळे त्याचा गैरफायदा घेवून प्रतिवादी क्र. १ दावा मिळकती तबदील करण्याच्या प्रयत्नात

USHA VEERENDRA INDAPURE
Digitally signed by USHA VEERENDRA INDAPURE
Date: 2026.07.30 16:39:59 +0530

असल्याचे वादीला समजले असून प्रतिवादी क्र. १ ने अशा प्रकारे दावा मिळकती तबदील केल्यास वादीचे नुकसान होईल. वादीच्या बाजुने प्रथमदर्शनी केस असून न्यायाचा तराजु वादीच्या बाजूने झुकलेला आहे. अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. वर नमुद विनंतीकरिता वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**७.** प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी निशाणी ३० अन्वये दाव्याला लेखी कैफियत व सदरच्या अर्जाला म्हणणे दिले. वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे नातेसंबंध व दावा मिळकतींचे वर्णन प्रतिवादींनी मान्य केले. दाव्यातील/अर्जातील इतर मजकूर प्रतिवादींनी नाकबूल केला आहे. प्रतिवादींनी दावा कलम १(अ) या मिळकतींमध्ये मेहनत मशागत करुन उत्पन्न घेवून वादीचे पालनपोषण केले असून वादी हा व्यसनाधीन आहे. तो कोणताही कामधंदा करीत नव्हता व नाही. वादीने पूर्वी सोनेचांदी गलाई व्यवसाय करीत असल्याचे दाव्यात अपूरे लिहीले असून वादीने गलाई व्यवसायाच्या भांडवलाकरीता प्रतिवादींचे ३० तोळे सोने नेले होते, परंतु वादीने प्रामाणिकपणे व्यवसाय न करता स्वत:च्या चैनीत ती रक्कम संपविली. सदरचे भांडवल घेताना दावा मिळकतीतील वादीचा १/५ हिस्सा दिलीप रामचंद्र गायकवाड व प्रमोद शिवाजी पवार यांच्यासमक्ष प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या हक्कात कायमस्वरुपी सोडून दिला होता. त्यामुळे दावा मिळकतीत वादीचा कोणताही हक्कसंबंध नव्हता व नाही असे प्रतिवादींचे म्हणणे आहे.

**८.** दावा कलम १(ब) ही मिळकत प्रतिवादी क्र. १ ने २००३ साली हळद व बाजरीचे पीक दावा मिळकतीत घेवून त्या पिकाच्या उत्पन्नातून प्रविण श्रीरंग खंडागळे यांच्याकडून रक्कम रुपये ३०,०००/- च्या मोबदल्यात खरेदीदस्त क्रमांक ६६७/२००३ अन्वये दिनांक २४/०३/२००३ रोजी खरेदी घेतली. या खरेदीदस्ताकरीता वादीने मोबदल्याची रक्कम दिलेली नव्हती, त्यामुळे सदरची मिळकत

USHA VEERENDRA INDAPURE
Digitally signed by USHA VEERENDRA INDAPURE
Date: 2026.07.30 16:40:04 +0530

प्रतिवादी क्र. १ ची स्वकष्टार्जित मिळकत आहे. गट क्र. ९६८/२ क्षेत्र ० हे. ०८ आर ही मिळकत दाव्यात समाविष्ट केली नसल्यामुळे एकत्र कुटूंबाच्या सर्व मिळकती दाव्यात समाविष्ट न केल्याची दाव्याला बाधा येते असे प्रतिवादींचे म्हणणे आहे.

९. दावा मिळकतींच्या उताऱ्यावर नमूद असलेल्या इतर हिस्सेदार यांना दाव्यात पक्षकार म्हणून सामील न केल्यामुळे आवश्यक पक्षकार सामील न केल्याची दाव्यास बाधा येते. दावा मिळकतींचा प्रतिवादी क्र.१ मालक व वहीवाटदार असल्यामुळे वादीला प्रतिवादींविरुध्द कोणत्याही प्रकारची ताकीद मागता येणार नाही. वादी हा प्रतिवादी क्र. १ व २ यांचा सांभाळ करीत नाही. प्रतिवादी क्र.१ व २ यांना रक्तदाब व मधूमेहाचा आजार असून दवाखान्याचा खर्च करावा लागतो. त्यांचे जीवन जगण्याकरीता दावा मिळकतींशिवाय दुसरा पर्याय नाही. वादीने प्रतिवादी क्र. १ व २ यांना वेळोवेळी काठीने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आहे. प्रथमदर्शनी वादीच्या बाजूने केस नसून न्यायाचा तराजू प्रतिवादी क्र. १ च्या बाजुने झुकलेला आहे. प्रतिवादी क्र. ३ व ४ हे प्रतिवादी क्र. १ व २ यांचा सांभाळ करीत आहेत. अशा परिस्थितीत वादीचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे नुकसान होईल, त्यामुळे अर्ज खर्चासह फेटाळून प्रतिवादींना वादीकडून रुपये ७०,०००/– नुकसान भरपाई देण्याचा आदेश करावा अशी प्रतिवादींनी विनंती केली आहे.

१०. वादी व प्रतिवादी यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकून व दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करुन विद्यमान दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, विटा यांनी वादीचा नि.क्र.५ चा अर्ज नामंजूर केला. सदरच्या आदेशावर नाराज होवून मूळ वादी यांनी प्रस्तुतचे अपिल दाखल केले आहे.

११. वादीच्या कथनानुसार विद्यमान दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, विटा यांनी आपल्या विवेकाधिकाराचा योग्य पध्दतीने वापर केला नाही. विद्यमान न्यायालयाने वादीच्या कथनास दुजोरा देणाऱ्या कागदपत्रांचा विचार केला नाही.

USHA VEERENDRA INDAPURE
Digitally signed by USHA VEERENDRA INDAPURE
Date: 2026.07.30 16:40:12 +0530

पक्षकारांचे कथन व दाखल केलेले कागदपत्र विचारात न घेता विद्यमान न्यायालयाने आदेश पारीत केलेला आहे. हिंदू कायद्यातील तरतुदीनुसार वडिलांना त्यांच्या नावे असलेली मिळकत विक्री करण्याचा अधिकार नाही या तत्त्वाचा विचार विद्यमान न्यायालयाने केला नाही. वादीने दाव्यासोबत व अर्जासोबत त्याचे प्रतिज्ञापत्र व दोन खरेदीदस्त दाखल केले आहेत, परंतु वादीने अर्जासोबत प्रतिज्ञापत्र दाखल केले नाही असे चुकीचे अनुमान विद्यमान न्यायालयाने काढले आहे. वादीच्या बाजुने प्रथमदर्शनी केस असताना न्यायालयाने वादीचा अर्ज नामंजूर केला आहे. सदरचा आदेश चुकीचा व बेकायदेशीर आहे. विद्यमान न्यायालयाने वादीच्या अर्जावर पारीत केलेला आदेश चुकीचा असल्यामुळे त्यात दखल घेवून तो अर्ज मंजूर करण्यात यावा असे वादीचे म्हणणे आहे.

**१२.** वादी व प्रतिवादींतर्फे वकीलांनी केलेला युक्तीवाद व अभिलेखावरील कागदपत्रांचा विचार केला असता खालील मुद्दे माझ्या विचाराधीन उपस्थित होतात. सदरचे मुद्दे व त्यावरील माझे कारणांसह निष्कर्ष खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीच्या बाजूने सकृतदर्शनी केस आहे का ? | नकारार्थी |
| २. | न्यायाचा तराजू कोणाच्या बाजूने झुकला आहे ? | प्रतिवादींचे बाजूने |
| ३. | अर्ज मंजूर किंवा नामंजूर केल्यास त्याचा कोणावर व काय परिणाम होईल ? | अर्ज नामंजूर केल्यास वादीचे नुकसान होणार नाही. |
| ४. | दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, विटा यांनी पारीत केलेल्या आदेशात हस्तक्षेप करण्याची गरज आहे काय ? | नाही |
| ५. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

USHA VEERENDRA INDAPURE
Digitally signed by USHA VEERENDRA INDAPURE
Date: 2026.07.30 16:40:17 +0530

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दे क्र.१ ते ५ करीता –</u>**

**१३.** अपिलार्थी/वादीतर्फे श्री. पी. डी. भोसले वकीलांनी युक्तीवाद केला, दावा मिळकत १(अ) व (क) या वादी व प्रतिवादी यांच्या वडिलार्जित मिळकती असून दावा मिळकत १(ब) ही वादीची खरेदीची मिळकत आहे. दावा मिळकत १(अ) व (क) मध्ये वादीचा १/५ हिस्सा असून या मिळकतींचे अद्याप वादी व प्रतिवादी यांच्यात वाटप झालेले नाही. वादीने दावा मिळकतीतील त्याचा हिस्सा प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या हक्कात सोडून दिल्याबाबतचा कोणताही पुरावा प्रतिवादींनी दिलेला नाही. फेरफार क्र. १९६८ अन्वये आप्पा भगवान शिंदे यानी दिलेल्या अर्जावरुन १९८९ साली दावा मिळकतींना प्रतिवादी क्र.१ च्या नावाची नोंद झाली असून त्या मिळकती वडिलार्जित मिळकती असल्याचे वादीने प्रथमदर्शनी सिध्द केले आहे. विद्यमान दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा यांनी दाखल कागदपत्राचा विचार न करता वादीचा अर्ज नामंजूर केला आहे. वादीच्या बाजूने प्रथमदर्शनी केस असून प्रतिवादींनी दावा मिळकती तबदील केल्यास वादीचे नुकसान होईल. त्यामुळे विद्यमान दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, विटा यांनी पारीत केलेला आदेश रद्द करून सदरचे अपील मंजूर करण्यात यावे असे अपीलार्थीतर्फे वकीलांनी युक्तीवादात सांगितले.

**१४.** रिस्पॉडंट/प्रतिवादींतर्फे श्री. एस. पी. दुगम वकीलांनी युक्तीवाद केला की, दावा मिळकत १(ब) चा मालक असल्याचे जाहीर होवून मिळण्याकरिता, दावा मिळकतींचे सरसनिरस मानाने वाटप होवून मिळण्याकरिता व निरंतर मनाई आदेश मिळण्याकरिता वादीने दावा दाखल केला आहे. दावा मिळकती प्रतिवादी क्र.१ च्या नावे असून त्या मिळकतींचा प्रतिवादी क्र. १ मालक व कब्जेवहीवाटदार आहे. प्रतिवादी क्र. १ हा ८० वर्षाचा असून वादीने प्रतिवादी क्र. १ व २ यांचा सांभाळ केलेला नाही. याउलट वादी हा प्रतिवादी क्र. १ व २ यांना मारहाण करतो, त्याबाबत त्याचेविरुध्द

USHA VEERENDRA INDAPURE
Digitally signed by USHA VEERENDRA INDAPURE
Date: 2026.07.30 16:40:22 +0530

प्रतिवादी क्र. १ व २ यांनी केसेस दाखल केल्या आहेत. वादीने त्याच्या हिस्स्याचे क्षेत्र प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या हक्कात सोडून दिले असल्यामुळे वादीला दावा मिळकतीतील वाटप मागण्याचा अधिकार राहिलेला नाही. वादी व प्रतिवादी यांनी दाखल केलेली कागदपत्र व त्यांचे वकीलांनी केलेला युक्तीवाद विचारात घेवून विद्यमान न्यायालयाने आदेश पारीत केला आहे, त्यामुळे त्या आदेशात दखल देण्याची आवश्यकता नाही. वादीच्या बाजुने प्रथमदर्शनी पुरावा नाही. न्यायाचा तराजू प्रतिवादींच्या बाजूने झुकला आहे. अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे नुकसान होईल. रिस्पॉडंटतर्फे वकीलांनी युक्तीवाद केला की, सदरचे अपील खर्चासह खारीज करण्यात यावे.

**१५.** दाव्याच्याकामी वादी व प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दावा मिळकतींच्या गाव नमुना ८अ च्या उताऱ्यात आप्पा भगवान शिंदे याचे खाते क्रमांक ३२ अन्वये गट क्र. १०७९, ५३९, ५४२, ८२१/अ, ९६८/१, ९६८/३, ९६८/५, ९९८/११, ९९८/१२, ९९८/१३ या मिळकतींच्या नोंदी आहेत. त्याचप्रमाणे सदरच्या सर्व मिळकतींच्या ७/१२ उताऱ्यांवर प्रतिवादी क्र. १ च्या नावाची नोंद असल्याचे दिसून येते. गट क्र. ५३७ च्या मिळकतीला प्रतिवादी क्र. ३ व ४ यांची नोंद फेरफार क्रमांक ११०२० अन्वये दिनांक ०२/११/२०२२ रोजी नोंदविल्याचे दिसून येते. दावा कलम १(क) मधील मिळकतींनाही आप्पा भगवान शिंदे याच्या नावाची नोंद असल्याचे लेंगरे गावच्या नमुना ८ चे सन २०१९-२० ते २०२२-२३ च्या उताऱ्यावरुन दिसून येते. फेरफार क्रमांक १९६८ अन्वये आप्पा भगवान शिंदे याच्या नावाची नोंद सर्व मिळकतींना १९८९ साली नोंदविण्यात आल्याचे दिसून येते.

**१६.** प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. ३ व ४ यांच्या हक्कात दिनांक २८/०९/२०२२ रोजी गट क्र. ५३७ क्षेत्र ०.०६ आर मिळकतीचे खरेदीदस्त रक्कम रुपये १,००,०००/- मोबदल्यात नोंदवून दिल्याचे नोंदणीकृत खरेदीदस्त क्रमांक

USHA VEERENDRA INDAPURE
Digitally signed by USHA VEERENDRA INDAPURE
Date: 2026.07.30 16:40:32 +0530

३२३७/२०२२ दिनांक २८/०९/२०२२ च्या खरेदीदस्तावरुन दिसून येते. सदरच्या खरेदीदस्तात घरखर्चासाठी व लोकांचे देणे भागविण्याकरिता मोबदल्याची रक्कम स्वीकारल्याबाबतचा मजकूर नमूद केलेला आहे. वादीने सदरचे खरेदीदस्त दाव्यात आव्हानीत केले आहे. प्रतिवादी क्र. १ चे २०२२ साली वय ७५ वर्षे असल्याचे दस्तात नमूद केले आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांचा वादी सांभाळ करीत नाही असे प्रतिवादींचे कथन आहे. त्यामुळे वादी हा प्रतिवादी क्र. १ व २ यांचा कशा प्रकारे सांभाळ करीत आहे व त्याच्याकडे कोणते उत्पन्नाचे साधन आहे ही बाब वादीने प्रथमदर्शनी सिध्द करणे अपेक्षित आहे. वादी हा त्याच्या आईवडिलांचा सांभाळ करीत असल्याचे दर्शविण्याकरिता त्याच्या घराच्या शेजारच्यांचे प्रतिज्ञापत्र वादी दाखल करु शकत होता, परंतु वादीने त्या अनुषंगाने कोणतेही कागदपत्र दाखल केले नाहीत. यावरुन प्रतिवादी क्र. १ व २ यांचा वादी सांभाळ करीत नाही हे प्रथमदर्शनी दिसून येते. प्रतिवादी क्र. १ चे अपिल मेमोत वय ७१ वर्षे व प्रतिवादी क्र. २ चे वय ६९ वर्षे नमूद केलेले आहे. प्रतिवादी क्र.१ व २ वयोवृध्द आहेत त्यामुळे या वयात आजार होवू शकतो. प्रतिवादी क्र.१ हा घरातील एकत्र कुटूंबाचा कर्ता म्हणून कुटूंबाच्या गरजा भागविण्याकरिता एकत्र कुटूंबाची मिळकत कोणाच्याही संमत्तीशिवाय विक्री करु शकतो.

**१७.** प्रतिवादी क्र. १ ने दिनांक २४/०३/२००३ रोजी प्रविण श्रीरंग खंडागळे, सत्यवान श्रीरंग खंडागळे, कांचन आनंदा क्षीरसागर, निर्मला संजय साळुंखे व राधाबाई श्रीरंग खंडागळे यांच्याकडून मौजे लेंगरे ग्रामपंचायत हद्दीतील गट क्र. ८२१/अ क्षेत्र १ हे. ६० आर व पो.ख. ०.०२ आर मिळकतीपैकी लिहून देणाऱ्यांचे २ आणे हिस्स्याची मिळकत नोंदणीकृत दस्ताने खरेदी घेतली आहे. वादीने त्याच्या कमाईतील रक्कम मोबदला म्हणून दस्त लिहून देणाऱ्यांना दिली असा मजकूर या दस्तात नमूद केलेला नाही. वादीने त्याच्या स्वत:च्या कमाईतून सदरची मिळकत खरेदी घेतल्याचे प्रथमदर्शनी कोणताही पुरावा दाखल केलेला नाही, त्यामुळे प्रथमदर्शनी सदरची मिळकत प्रतिवादी क्र. १ ने खरेदी केलेली मिळकत असल्याचे

USHA VEERENDRA INDAPURE
Digitally signed by USHA VEERENDRA INDAPURE
Date: 2026.07.30 16:40:37 +0530

दिसून येते.

**१८.** गट क्र. ९६८/२ च्या ७/१२ उताऱ्यावरुन सदरच्या मिळकतीला चंद्रकांत आप्पा शिंदे अ.पा.क. आप्पा अशी नोंद फेरफार क्र. ५७३ अन्वये नोंदविलेली असून ही मिळकत वादीने दाव्यात समाविष्ट केलेली नाही. अशा परिस्थितीत एकत्र कुटूंबाच्या सर्व मिळकती दाव्यात समाविष्ट केल्या नसल्याबाबत प्रतिवादीनी लेखी कैफियतीत केलेल्या कथनात तथ्य आहे.

**१९.** वादीने अर्जात नमूद केले आहे, प्रतिवादी हे दावा मिळकती तबदीलीचा व्यवहार करण्याच्या प्रयत्नात असल्याचे वादीला खात्रीलायक समजले आहे. वादीला ही माहीती कशाच्या आधारे समजली याचा खुलासा वादीने करणे अपेक्षित आहे. दावा मिळकती विक्री करण्याच्या उद्देशाने प्रतिवादी क्र. १ ने खरेदीदारांना दावा मिळकती आणून दाखविल्या किंवा त्रयस्थ इसमांनी दावा मिळकतीत येवून मिळकतीची पाहणी केली असे वादीचे कथन नाही.

**२०.** विद्यमान दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, विटा यांनी पारीत केलेल्या आदेशाचे अवलोकन केले असता असे दिसून येते, विद्यमान न्यायालयाने वादी व प्रतिवादी यांनी दाखल केलेले कागदपत्रे व दोन्ही बाजुंच्या वकीलांचा युक्तीवाद याचा साकल्याने विचार केलेला आहे. त्याचप्रमाणे मालमत्ता हस्तांतरण कायद्याच्या कलम ५२ बाबतचा उहापोह केला आहे व मा. उच्च न्यायालय यांचे **Kachhi Properties Vs. Ganpatrao Kadam, 2010(5) Bom. CR. 43** या न्यायनिवाड्यातील गुणोत्तराचा आधार घेतला आहे. अशा परिस्थितीत विद्यमान दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा यांनी पारीत केलेला आदेश योग्य व कायदेशीर असल्यामुळे त्या आदेशात दखल देण्याची आवश्यकता नाही.

**२१.** दाखल कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ ने कुटूंबाच्या हिताकरीता व कायदेशीर गरजा भागविण्याकरिता प्रतिवादी क्र. ३ व ४

USHA VEERENDRA INDAPURE
Digitally signed by USHA VEERENDRA INDAPURE
Date: 2026.07.30 16:40:43 +0530

यांच्या हक्कात गट क्र. ५३७ च्या मिळकतीचे खरेदीदस्त करुन दिले आहे. प्रतिवादी क्र. १ ते ४ दावा मिळकती तबदील करीत असल्याचे वादीने प्रथमदर्शनी शाबीत केले नाही. प्रतिवादी क्र. २ ते ४ यांच्या नावाची नोंद दावा मिळकतींना नोंदली नसल्यामुळे त्या मिळकती तबदील करण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही. एकत्र कुटूंबाच्या सर्व मिळकती दाव्यात समाविष्ट केल्या नाहीत, याचाच अर्थ वादी हा स्वच्छ उद्देशाने न्यायालयात आलेला नाही. अशापरिस्थितीत वादीच्या बाजुने प्रथमदर्शनी केस नसून, न्यायाचा तराजू प्रतिवादींच्या बाजुने झुकलेला आहे. प्रतिवादींविरुध्द मनाई आदेश पारीत केल्यास प्रतिवादींचे नुकसान होईल. या सर्व बाबींचा विचार केला असता दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, विटा यांनी पारीत केलेल्या आदेशात हस्तक्षेप करण्याची आवश्यकता नसल्यामुळे रिस्पॉडंटतर्फे वकीलांनी केलेला युक्तीवाद ग्राहय मानून व अपेलंटतर्फे वकीलांनी केलेला युक्तीवाद फेटाळून मुद्दे क्रं.१ ते ४ चे निष्कर्ष वरीलप्रमाणे देवून मुद्दा क्रं.५ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१.** किरकोळ दिवाणी अपिल नामंजूर करण्यात येत आहे.

**२.** दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, विटा यांचा निशाणी ५ खालील आदेश कायम करण्यात येत आहे.

**३**. सदर अपीलाचा खर्च ज्याचा त्याने सोसावा.

**४.** सदर आदेशाची प्रत विद्यमान दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, विटा यांना माहीतीस्तव पाठविण्यात यावी.

**५.** वरील आदेशाप्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर केला.)

USHA VEERENDRA INDAPURE

Digitally signed by USHA VEERENDRA INDAPURE
Date: 2026.07.30 16:40:53 +0530

**विटा.** **(उषा वि. इंदापूरे)**

**दिनांक ३०.०७.२०२६** **जिल्हा न्यायाधीश–२, विटा.**

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file, are same word to word, as per the original order.

Name of Stenographer : S.K.Patil (Steno Grade-I)

Court : District Judge-2, Vita

Date of order : 30.07.2026

Signed by Presiding officer on: 30.07.2026

Uploaded on : 30.07.2026